# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- २३/०३/२०१८

दिनांक २२/०३/२०१८ रोजी मा. अपर पोलीस अधीक्षक महेंद्र पंडीत सो. यंाच्या आदेशान्वये व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील दारुबंदी पथकातील अधिकारी पोउपनि युवराज घोडके यांच्या पथकाने मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे मौजा वासाडा ता. आरमोरी येथील शेतशिवारातील असलेल्या मोहादारु हातभट्टी वर धाड टाकली. यावेळी घटनास्थळावरुन १) २०,०००/- रुपये प्रत्येकी २० लिटर क्षमतेच्या ५ प्लास्टिक मध्ये १०० लिटर हातभट्टी मोहदारु २) २२,५००/- रुपये प्रत्येकी ५० किलो क्षमतेच्या वेगवेगळया प्लास्टिकच्या ३ बॅगमध्ये एकूण १५० किलो मोहासडवा असा एकूण ४२,५०० रुपयाचा मुद्देमाल घटनास्थळी मिळून आल्याने मोहदारु हातभट्टी चालवित असलेल्या आरोपी नामे रुपचंद जयराम पुस्तोडे रा. वासाडा ता. आरमोरी जि. गडचिरोली यास ताब्यात घेवुन आरमोरी पोस्टे येथे मुदाका कलम ६५ (इ) (फ) प्रमाणे अप क्र. ७०/१८ दाखल केला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास नापोशी/२३३८ येलोरे हे करीत आहे.